MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक – दिपक थोरात

युवाशक्तीचा उद्या महाएल्गार

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे लोकप्रिय संवेदनशील मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब व लोकप्रिय खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यतत्परतेला प्रेरित होऊन आज महाराष्ट्रातील तळागाळातील युवावर्ग लाखोच्या संख्येने युवा सेनेसोबत उभे राहत आहेत. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेस सरनाईक, आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण, हे तळागाळातील युवा सैनिकांना आपल्या सोबत घेऊन महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाडा पिंजून काढत आहे. व युवा सेना अजून मजबूत करण्यासाठी राज्यासह मराठवाडा दौरा करत आहेत. याचेच औचित्य साधून उद्या दिनांक १४/१०/२०२४ रोजी वार सोमवार वेळ ठिक १२ : ३० वाजता आशिर्वाद लॉन्स, सोमेश्वर मंदिर बाजुला, बार्शी रोड बीड येथे होणार आहे. युवासेनेचे राज्य कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक हे या कार्यक्रमात आपली हजेरी लावणार आहेत. या महत्वपूर्ण कार्यक्रमात ते उद्या बीडमध्ये येत असून ते उद्या बीड जिल्ह्यातील तमाम युवा सैनिकांना आपले मोलाचे मार्गदर्शन करणार आहेत. त्यासोबत आरोग्य दूत बाजीराव चव्हाण आपल्या हजारो युवासैनिक, तसेच शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे शेकडो पदाधिकारी, व बीड जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिक व त्यांचे खंदे समर्थक, कार्यकर्ते यांच्यासह आपली युवाशक्तीची ताकद दाखवून देणार आहेत. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांचा हा उद्याचा दौरा बीड साठी महत्वपूर्ण माणला जात आहे. या कार्यक्रमात आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण यांची बीडची उमेदवारी व त्यांना येणाऱ्या विधासभेसाठी ग्रीन सिग्नल मिळणार असल्याचेही बीड जिल्ह्यात चर्चा जोरदार होत आहे. त्यामुळे बाजीराव चव्हाण आपल्या पाठीशी हजारोंच्या संख्येने युवाशक्तीची असलेली ताकत दाखवुन देतील अशी सध्या चर्चा आहे. त्यामुळे उद्याच्या या अभुतपुर्व कार्यक्रमास बीड जिल्ह्यातील युवाशक्तीने लाखोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवा सेनेचे युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, व युवा सेना बीड जिल्हा प्रमुख सुमित कोळपे, युवा सेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी केले आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –२६ | रविवार दि.१३ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -26 | SUNDAY DT.13 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

ऐन २०२४ विधानसभा निवडणुकीच्या तोंडावरच बाबा सिद्दिकीची हत्या म्हणजे अल्पसंख्याक समाजाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न?

- अजित पवारांच्या राष्ट्रवादीला बाबा सिद्दिकी यांचा मोठा पाठिंबा त्यामुळे राजकीय षडयंत्र आहे का हे तपासणी गरजेचे?
- बीड शहरामध्ये बाबा सिद्दिकींचा मोठा कार्यक्रम झाला होता तो शेवटचा राजकीय कार्यक्रम ठरला?
- बाबा सिद्दिकी यांच्या हत्यानंतर तरी अल्पसंख्याक समाजाने आवाज उठून योग्य तो निर्णय २०२४ च्या विधानसभेमध्ये घ्यावा?
- वाय दर्जाची सुरक्षा असलेल्या नामांकित अल्पसंख्याक नेते बाबासाहेब पण सुरक्षा यंत्रणा काय करत होती?
- बाबा सिद्दिकींना मुस्लिम समाजात सह अठरापगड जातीतील एक मोठं नाव असलेली नेते म्हणून ओळख?
- बाबा सिद्दिकींच्या विरोधात कोण कोण षडयंत्र करत होते हे सीआयडी मार्फत चौकशी होणे गरजेचे?
- बाबा सिद्दिकींना गोळ्या घालणारे दोन शूटर बहराइचचे
- दोघेही शेजारी, १८–१९ वर्षे वयोगटातील कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही

मुंबई पोलिसांनी घटनास्थळावरून पुरावे गोळा केले

वांद्रे येथील खेर नगर येथील आमदार पुत्र झिशान यांच्या कार्यालयाबाहेर काल रात्री ९.३० च्या सुमारास सिद्दिकी यांच्यावर ३ हल्लेखोरांनी गोळीबार केला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑटोमध्ये आलेल्या ३ शूटर्सनी दोन बंदुकांमधून ६ राऊंड फायर केले. बाबांना तीन गोळ्या लागल्या. दोन गोळ्या त्यांच्या पोटात तर एक गोळी छातीवर लागली. तिघांनी तोंडाला रुमाल बांधले होते.

बहराइच /प्रतिनिधी

राष्ट्रवादीचे नेते बाबा सिद्दिकी यांची मुंबईत गोळ्या झाडणारे दोन हल्लेखोर उत्तर प्रदेशातील बहराइच येथील आहेत. बहराइचच्या एसपी वृंदा शुक्ला यांनी याला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले– धर्मराज कश्यप असे एका आरोपीचे नाव आहे. दुसरा शिवकुमार गौतम उर्फ शिव.शिवा फरार आहे तर धर्मराजला मुंबई पोलिसांनी पकडले आहे. दोघेही एकाच गावातील गंडारा येथील रहिवासी आहेत. घरे शेजारी शेजारी आहेत. वय साधारण १८–१९. दोघेही पुण्यात भंगार विक्रेते म्हणून काम करायचे. त्यांचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड अद्याप सापडलेला नाही.एसपी म्हणाल्या की, दोघेही सामान्य कुटुंबातील आहेत. कुटुंबीयांशीही संपर्कात होते. पोलिस दोघांच्याही घरी पोहोचले असून कुटुंबीयांशी बोलणे सुरू आहे. या घटनेबाबत कुटुंबीयांकडे काय माहिती आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

बाबा सिद्दिकी यांची शनिवारी रात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ नराधमांनी हा गुन्हा केला आहे. तिसऱ्याचे नाव गुरमेल बलजीत सिंग (२३ वर्षे, रा. हरियाणा) असे आहे.

शिव पुण्यात ६ वर्षांपासून काम करत होता, धर्मराजला दोन महिन्यांपूर्वी बोलावले

बहराइच पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिव ६ वर्षांपासून पुण्यातील एका भंगार विक्रेत्याकडे काम करत होता. दोन महिन्यांपूर्वी शिवाने शेजारी असलेल्या धर्मराजलाही कामानिमित्त पुण्याला बोलावले. सुपारी देणाऱ्या व्यक्तीने शिव आणि धर्मराज यांची गुरमेलला भेटण्याची व्यवस्था केली होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या ४० दिवसांपासून मुंबईत राहून शूटर सिद्दिकीची रेकी करत होते. २ सप्टेंबरपासून ते कुर्ला येथे भाड्याच्या खोलीत राहत होते. अटक करण्यात आलेल्या दोन्ही शूटर्सनी सांगितले की त्यांनी बाबांचे घर आणि मुलाच्या ऑफिसची रेका केली होती.

हे कॉन्ट्रॅक्ट किलिंग असल्याच्या वृत्ताला मुंबई पोलिस सूत्रांनी दुजोरा दिला आहे. सुपारी देऊन बाबा सिद्दिकींची हत्या करण्यात आली होती. सुपारी कोणी दिली? कितीची दिली? हा अजूनही तपासाचा विषय आहे.

मुंबई पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येचे कंत्राट शिवकुमारला मिळाले होते.मुंबई पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येचे कंत्राट शिवकुमारला मिळाले होते.

शिवचे वडील म्हणाले – मुलाला फूस लावली होती

शिव गौतमचे वडील बाळकृष्ण म्हणाले– आम्हाला आज सकाळीच कळले. पोलिस आले होते. चौकीवर नेऊन आमची चौकशी केली. माझा मुलगा काहीही चूक करू शकत नाही. त्याला फूस लावली आहे. मी १५–२० दिवसांपूर्वी शिवशी बोललो. माझ्याकडे फोन नव्हता. १५ दिवसांपूर्वी त्याने मला हरीश नावाच्या मुलाकडे फोन केला होता.

धर्मराजच्या घराबाहेर मोठ्या संख्येने लोक जमा झाले आहेत. पोलिस कर्मचारीही तैनात आहेत.

धर्मराजची आई म्हणाली– महिन्याभरापूर्वी तिचे मुलाशी बोलणे झाले होते. आम्ही त्याला लवकर येण्यास सांगितले. त्यावर त्याने होळीला येणार असल्याचे सांगितले. पोलिस आमच्याकडे आले. माझे नाव विचारले. मला अनुराग आणि धर्मराज अशी दोन मुले आहेत. मुलगी नाही. याची माहिती आम्ही पोलिसांना दिली. आम्हाला काही कळत नाही. माझा मुलगा दोन महिन्यांपूर्वी आला होता. दिल्लीला जातो सांगितले.

सिद्दिकींना वाय–सुरक्षा मिळाली होती, पण त्यांच्यासोबत एकही हवालदार नव्हता. पथदिवे आणि सीसीटीव्हीही बंद होते. दुसऱ्या शूटरला अटक करण्यात आली आहे, तर तिसऱ्या शूटरचीही ओळख पटली आहे. अनेक राज्यात पोलिस त्याचा शोध घेत आहेत. गेल्या ४० दिवसांपासून मुंबईत राहून शूटर सिद्दिकी यांचे घर आणि मुलाचे कार्यालयाची रेकी करत होते.

सुरुवातीपासूनच या घटनेमागे गँगस्टर लॉरेन्स गँगचा हात असल्याचा संशय होता. लॉरेन्स गँगचे नाव समोर आल्यानंतर अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटबाहेर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. पोलिसांची अतिरिक्त तुकडी तैनात करण्यात आली आहे. लॉरेन्स गँगने १४ एप्रिल रोजी सलमानच्या घराबाहेर गोळीबार केला होता.

बीड जिल्ह्यातील ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची होणारी अडवणूक तात्काळ थांबवा– अनिलदादा जगताप

बीड ।प्रतिनिधी

शासन परिपत्रकानुसार ग्रामिण भागाकरिता ग्रामसेवक यांना बांधकाम कामगारांचा ९० दिवसाचे काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी प्रधिकृत म्हणून नेमले आहेत. परंतू सबंधित ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक होत असून आम्हाला वरुन आदेश नाहीत, असे सांगून बांधकाम कामगारांची बोळवण केली जात आहे. बांधकाम कामगारांचे हेलपाटे बंद व्हावेत तसेच ग्रामसेवकांना बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी लागणारी सही व शिक्का देण्या बाबतचे योग्य ते मार्गदर्शन करून कामगारांचा होणारा मानसिक त्रास थांबवावा अशा सूचना शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी पंचायत समिती अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना जिल्हा शाखा, बीड ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक होत असल्यामुळे त्रस्त आहे. यामुळे या संघटनेने संगितादेवी पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे धाव घेऊन निवेदन दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लागलीच कार्यवाही करत पंचायत समिती अधिकारी सर्व यांना पत्रक काढून ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक थांबवावी व ग्रामसेवकांकडून काम होत नसल्यास त्या ठिकाणी अन्य कुणाची नियुक्ती करावे अशा सूचना केल्या आहेत. मात्र अद्याप पंचायत समितीतील अधिकाऱ्यांनी कुठलीच कार्यवाही केली नसल्याने बांधकाम कामगारांनी अनिलदादा जगताप यांच्यासमोर आपल्या अडचणींचा टाहो टाहो फोडला. या सर्व अडचणी लक्षात अनिलदादा जगताप यांनी पत्रक जाहीर करून पंचायत समिती अधिकारी सर्व यांना सूचना केल्या आहेत की, बीड जिल्हयातील ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक तात्काळ थांबवा. अन्यथा शिवसेना पंचायत समितीमध्ये बांधकाम कामगारांच्या अडचणी सोडविण्याकरिता येईल व तिथून पुढे होणाऱ्या परिणामांना आम्ही जिम्मेदार नसतोल.

बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या नावासाठी माजी सैनिक अनुरथ वीर यांचे तीव्र उपोषण..!

प्रशासनानी दखल घ्यावी - राजेंद्र मस्के

बीड ।प्रतिनिधी

अहिल्यानगर - बीड - परळी रेल्वे मार्गावरील बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी माजी सैनिक अनुरथ सोपान वीर यांचे गेली चार दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर तीव्र अन्नत्याग उपोषण चालू असून, त्यांनी जलत्यागही सुरु केला आहे. प्रशासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी. वीर यांना ठोस आश्वासन देऊन, उपोषण मागे घेण्यासाठी तातडीने प्रयत्न करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

आज जिल्हाधिकारी कार्यलयासमोर माजी सैनिक अनुरथ वीर यांचे चालू असलेल्या उपोषण स्थळी राजेंद्र मस्के यांनी भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली. यावेळी आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते.बीड जिल्हा हा मागास जिल्हा, गतिमान विकासासाठी रेल्वेची गरज असते. अहिल्यानगर - बीड - परळी हा रेल्वे मार्ग होण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, पत्रकार, तरुण युवक अशा विविध क्षेत्रातील अनेकांनी पुढाकार घेऊन, रेल्वे मंजुरीसाठी आंदोलने केली. जनतेची मागणी लक्षात घेऊन, स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी रेल्वे मार्ग मंजुरीसाठी स्वत: पुढाकार घेतला. केंद्र व राज्य सरकारने संयुक्तिकपणे भरीव आर्थिक तरतूद केली. पुढे तत्कालीन खासदार प्रितमताई मुंडे यांनी भाजपा महायुती केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करून निधी आणला. अहिल्यानगर ते आष्टी रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून, पुढील काम अंतिम टप्प्यात आहे.आंदोलनातून मंजूर झालेला रेल्वे मार्ग आणि आता बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे यासाठी आंबेडकरी विचाराचे कार्यकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहेत. माजी सैनिक अनुरथ वीर यांचे उपोषण चालू असून त्यांची प्रकृती गंभीर होऊ लागली आहे. निवृत्त माजी सैनिकाच्या तीव्र उपोषण आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. अशी मागणी राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली आहे.

माजलगाव दणाणले ; तहसील वर विविध मागण्यासाठी मातंग समाज अधिकार मोर्चा

मोर्चाचे नेतृत्व अमोल शेरकर यांनी केले

माजलगाव । सुनिल थोरात

समाज सत्तेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व विविध मागण्यासाठी माजलगाव मध्ये मातंग अधिकार मोर्चा धडकला. हक्क हे मागून मिळत नसतात त्यासाठी संघर्ष करावा लागतो या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीचा पाया अंगीकृत करून समाजाच्या विविध मागण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख मागण्या अशा होत्या की साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे, अ ब क ड आरक्षण वर्गीकरण लवकरात लवकर लागू करावे, माजलगाव शहरात अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह उभे करावे, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ सुरू करून महामंडळाची पारदर्शक कारभाराची राज्य सरकारने हमी द्यावी, गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करून संरक्षण द्यावे, पदोन्नती आरक्षण लागू करावे, ऊसतोड कामगारांच्या मुलांचे पुनर्वसन करावे या प्रमुख मागण्याचे निवेदन माजलगाव तहसीलदार यांना देण्यात आले. अमोल शेरकर यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले.अमोल शेरकर

यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की यापुढे मातंग समाजाला विश्वासात घेतल्याशिवाय मातंग समाज कोणालाही मतदान करणार नाही.मातंग समाजाचा एकही नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य नाही.मातंग समाजाचा नगरपालिकेमध्ये नगरसेवक करावा लागेल पंचायत समितीमध्ये सदस्य करावा लागेल जिल्हा परिषद मध्ये जिल्हा परिषद सदस्य करावा लागेल तरच तुम्हाला मांगाचे मत मिळेल अन्यथा मिळणार नाही असेही सांगितले. तसेच अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करावे अशा विविध मागण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चामध्ये महिला भगिनींसह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

शेतकरी विरोधी सरकारची तेलगावात दशक्रिया करून निघाला पायी मोर्चा

बीडकडे चौदावा करायला

किल्लेधारूर / प्रतिनिधी

नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना विमा नाही, अनुदान नाही. कठीण परिस्थितीत कसबस पिकविलेल्या शेतमालाला भाव नाही. चौहीकडून शेतकऱ्यांचा गळा घोटणाऱ्या सरकारचा दशक्रिया विधी तेलगाव येथे करण्यात आला असून चौदावा बीड येथे करण्यासाठी किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी बीडच्या दिशेने प्रवास सूरू केला आहे, अशी माहिती किसान सभेचे बीड जिल्हा अध्यक्ष कॉ. अजय बुरांडे यांनी दिली.

शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या सरकारच्या विरोधात किसान सभेच्या वतीने तेलगाव येथे गेल्या दहा दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. शेतकरी या सरकारच्या धोरणामुळे व नैसर्गिक संकटाने पूर्णपणे कोलमडला आहे. अशा संकटात शेतकऱ्यांना विम्याचा आधार मिळणे हा शेतकऱ्याचा हक्क आहे. पण वीमा योजनेतून शेतकऱ्यांना आधार देण्या ऐवजी विमा कंपन्यांचे व राजकीय दलालांचे खिसे भरण्यात सरकारला जास्त रस आहे. त्यामुळे विमा दिल्याच्या नुसत्या घोषणा केल्या जात आहेत. तुम्ही विमा दिला म्हणता मग त्या लाभार्थी शेतकऱ्यांची यादी मात्र दिली जात नाही. अनुदान वाटपाच्या घोषणा केल्या जात आहेत. मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काही पडत नाही. शेतमालाचे भाव तर या वर्षी पार रसातळाला गेले आहेत. हमी भावापेक्षा खूप कमी भाव व्यापारी देत आहेत. खरेदी केंद्र सुरू करण्याच्या फक्त थापा मारल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर किसान सभेने ९ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चार दिवस धरणे आंदोलन केले जिल्हाधिकारी यांनी लेखी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करा म्हणून गेली दहा दिवस तेलगाव येथे धरणे आंदोलन केले. मात्र मुर्दाड सरकारने त्याकडे सपसेल दुर्लक्ष केले. अखेर संतप्त शेतकऱ्यांनी अशा मुर्दाड सरकाचा दशक्रिया विधी तेलगाव येथे केला.सरकारच्या नावे किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी मुंडन करून चौदावा करण्यासाठी शेतकरी पायी चालत बीडच्या दिशेने निघाले आहेत. १३ ऑक्टोबर रोजी तेलगाव येथून चालत निघून १६ तारखेला हे शेतकरी बीड येथे पोहचतील या प्रवासात जागोजागी सरकारच्या चुकीच्या धोरणाचा विरोध आणि हक्काच्या लढाईचा एल्गार करत किसान सभेचे हे शेकडो शेतकरी पुढचं पाऊल टाकत आत्ता बीड गाठत आहेत.पुढे हे आंदोलन अधिक तीव्र होऊन जिल्हाभरातून प्रचंड प्रतिसाद मिळण्याचे संकेत दिसत आहेत.या आंदोलनासाठी दत्ता काका डाके,अजय बुरांडे,मुरलीधर नागरगोजे, जगदीश फरताडे,भगवान बडे,कडभाने,ब्राम्हनंद देशमुख, विष्णूपंत देशमुख,कृष्णा सोळंके, सुभाष डाके, अशोक डाके, काशीराम सिरसाट, ऍड.चोले, दादासाहेब सिरसाट आदींनी परिश्रम घेतले.खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट देऊन सोबत असण्याचा शब्द दिला.रामराव लगड (माजी शिक्षण अधिकारी) यांनी पाठिंबा दिला.

अनुरथ सोपानराव वीर माजी सैनिकची तब्येत खालावली?

अनुरथ वीर प्रशांत वासनिक प्रेम कांबळे रजित वाघमारे सह अन्य भीमसैनिकांनी रेल्वे स्थानकाला डॉ बाबासाहेब आंबेडकराच्या नावाचं आंदोलन उभा केलं?

बीड ।प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी बीड शहरात म्हणजेच ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये रेल्वे स्टेशनला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक कार्यकर्त्यांनी नाव दिले होते ते नाव पोलीस प्रशासनाने काढल्यामुळे बीड शहरांमध्ये दलित समाजामध्ये त्याचा तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे त्यासाठी बीड जिल्ह्यामध्ये व महाराष्ट्रामध्ये एक वेगळा संदेश गेला आहे त्यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे घटना या भारत देशाला चालती परंतु बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव का चालत नाही असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होत आहे यात माजी सैनिक अनुरोध वीर हे उपोषणाला बसलेले आहेत त्यांची प्रकृती खालावली असताना मात्र आता प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे व लोकप्रतिनिधी खासदार आमदार पालकमंत्री यांनी लक्ष देणे गरजेचे आहे

उपरोक्त विषयांकीत सविनय पुर्वक विनंती निवेदन सादर करण्यात येतो की, मी माजी सैनिक असुन मी मा.

जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांच्या दालनासमोर दिनांक १०/ १०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता पासुन आमरण उपोषण करणार असुन यामध्ये मी माझ्या मागण्या पूर्ण होईपर्यंत कायद्याचे पालन करुन उपोषण करणार आहे. यामध्ये माण्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव बीड येथील रेल्वे स्टेशनला शासनाने आपल्यामार्फत कायमस्वरुपी घोषीत करावे. व तेथे आम्ही लावलेल्या फलकाला पोलीस बंदोबस्त देण्यात यावा जेणेकरुन महामानवांची विटंबणा होण्याचे प्रकार होणार नाहीत. तरी सदरील बीड येथील रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्टेशन, बीड असे नांव शासनामार्फत घोषीत करण्यात यावे व आम्ही दिलेल्या बीड रेल्वे स्टेशनच्या नामफलकाला आपल्यामार्फत संरक्षण मिळावे.

२. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांने महापरिनिर्वान मुंबई येथे झालेले असुन ५० वर्षापासुन दादर रेल्वे स्टेशनला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव दिलेले नाही. जाणीवपुर्वक शासनाने याकडे दुर्लक्ष केलेले आहे. आम्ही महामानवांची परंपरा जपणारे अनुयायी असुन हा महाराष्ट्र शिव-शाहु फुले आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र असेल तर वरील माझ्यामागण्या मान्य होतील यात कसलीही शंका नाही.

तरी मी दिनांक १०/१०/२०२४ पासून आपल्या दालणासमोर संसैधानीक पध्दतीने आमरण उपोषण सुरु करणार असुन याची सर्वस्वि जबाबदारी प्रशासनाची राहिल. माजी सैनिक जे बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमत बीडचा रिझल्ट असताना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे म्हणून उपोषणाला बसलेले आहेत त्यांची प्रकृती खालावल्यामुळे जर काही त्यांच्या जीवाचे बरे झाले तर त्याला प्रशासन जबाबदार राहील असेही सध्या १८ पगड जातीतील लोक राजकीय नेते मंडळी यांना सांगत आहेत.

आज दि १२ आक्टोंबर २०२४ वार शनीवार रोजी दसरा मेळावा नारायणगड येथे आरोग्य पथक प्रा आ केंद्र राजुरी (न) चे वैद्यकीय अधिकारी दत्ता राऊत , सुमदाय आरोग्य अधिकारी नितेश गावडे , नितीन महुवाले , अशोक खेडकर , नितीन शाहगडकर , हरिभाऊ चव्हाण , अशोक डावकर , सचिन बांगर , गणेश दहिवाले , आदी

६० कोटींच्या कामात पत्रकारांची व्यवस्था केली म्हणना-या जयदत्त नरवडेंची याच कामात कोणती व्यवस्था झाली ?

दादांच्या लाडक्या जयदत्त नरवडेंची जिभ घसरली ?
जनता सगळं जाणुन आहे टक्केवारीचे आरोप उगाच होत नाहीत आण्णा!
जयदत्तराव माध्यमांची मुंगी चावल्यास लुंगी फिटेल ?

माजलगांव ।प्रतिनिधी

माजलगांव मतदार संघात सध्या विविध विकास कामांच्या उदघाटनाचा जणु धुराळाच उडाला आहे त्यात ज्या त्या परिसरातील आपले पिद्दु आमदार सोळंके यांच्याकडुन बोलविते केले जात आहेत. माळेवाडी सुलतानपुर या ठिकाणी हॅम अंतर्गत सादोळा ते राजेगाव या सुमारे ६० कोटींच्या कामाचे उदघाटन रविवारी आचार संहितेच्या भितीपोटी उरकण्यात आले यावेळी पार पडलेल्या छोटेखाणी कार्यक्रमात आ. सोळंके यांचे गचपडीची गोळी खावुन विविध सत्तेच्या पदांचा मलिदा खाणा-या जयदत्त नरवडे यांनी अत्यंत मिश्किलपणे पत्रकारांची खोड काढतांना तुमची सगळीच सोय करण्यात आली आहे असे म्हणुन उपस्थित पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला याला कांही पत्रकार बांधवांनी लगेचच विरोध केल्यावर माफीचे सोयिस्करही त्यांनी पार पाडले परंतु स्वतःच्या परिसरात होत असलेल्या कार्यक्रमात जयदत्त नरवडेंची देखील संबंधीत कंत्राटदार एजन्सीने चांगलीच व्यवस्था केलेली दिसते त्यामुळेच नरवडे यांना आपली जीभ कुठे घसरतेय हे कळले नसावे ? असे आता बोलल्या जात आहे.

माजलगांव आणि गेवराई विधानसभेच्या बांधावर असलेल्या सादोळा ते राजेगांव या परिसराचा विकास तसा खुपच आडगळीला राहिलेला आहे. परंतु मागील काळात होत असलेला जनरेटा पाहुन हॅम अंतर्गत १३ किलोमिटरच्या कामासाठी तब्बल ६० कोटी रुपयांचा निधी शासनाने दिला.

आगामी दोन चार दिवसांत आचार संहिता लागण्याचे संकेत आहेत त्यामुळेच तडकाफडकी कामांची उदघाटने उरकण्याचा घाट घातला जात आहे. असेच एक उदघाटन माळेवाडी या ठिकाणी पार पडले. एरव्ही प्रत्येकवेळी पत्रकारांची ऍलर्जी असलेल्या बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडेंच्या भागात हे काम होत असल्यामुळे अगदी लगबगीने फोन लावुन पत्रकारांनाही या कार्यक्रमासाठी निमंत्रीत करण्यात आले. मात्र जयदत्त नरवडेंना या उदघाटनाच्या कार्यक्रमात कुठला उत्साह होता हे कळुन आले नाही कारण नरवडे हे त्यांच्या प्रास्ताविकात चक्क पत्रकारांवरच घसरले आणि पत्रकारांकडे बघुन त्यांनी अत्यंत मिश्कीलपणे तुमची तर सगळीच व्यवस्था केली आहे असे म्हणुन पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला. त्यावर कांही पत्रकार बांधवांनी लगेचच आक्षेप घेतला असता आपल्याकडुन चुक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले व त्यांनी जाहिररित्या माफी देखील मागीतली. मात्र कार्यक्रमाला बोलावुन वरुन अशा पध्दतीने वागविल्यामुळे पत्रकारांकडुन या बाबीचा जाहिर निषेध नोंदवला जात आहे. तर आ. सोळंकेंनी अशा बाडगुळ पिददुंना आवरावे अशी मागणी देखील पत्रकारांकडुन केल्या जात आहे.

दरम्यान मांडीआड करुन तंगडी खाणा-या जयदत्त नरवडे यांना कायम पत्रकारांची ऍलर्जी राहिलेली आहे मात्र नक्कीच ६० कोटींच्या कामात चांगलाच मलिदा मिळणार असल्याने एव्हाणा मिळालेला असल्याने नरवडे कदाचित भारावले असावेत आणि त्यातुनच त्यांनी अशा प्रकारे खिजविण्याचा प्रकार केला असावा असे आता बोलल्या जात आहे.

-- जयदत्तराव माध्यमांची मुंगी चावल्यास लुंगी फिटेल ?

जयदत्त नरवडे हे मागील अनेक वर्षांपासुन बाजार समितीत उपसभापती व त्यानंतर आता सभापती म्हणुन मांडी आड करुन खंडी खात आहेत पण त्यांची गत डोळे बंद करुन दुध पिणा-या मांजरागत आहे त्या मांजराला वाटतं डोळे बंद केल्याने आपल्याकडे कुणी पाहात नाही. परंतु असे नसुन बाजार समितीत नरवडेंनी काय काय दिवे लावलेत आणि त्या दिव्यात तेल कुठुन कुठुन आलं हे सर्व माध्यमांना तर सोडाच सर्वसामान्यांनाही माहित आहे त्यामुळे असेच घसरत राहिलात तर माध्यमांची मुंगी तुमच्या कुठल्या भागाला चावेल आणि विविध ठिकाणच्या आपल्या कारभाराची लुंगी कशी फिटेल याची कल्पना सुध्दा तुम्हाला लागणार नाही. अशा प्रतिक्रिया बाजार समितीविषयीच्या जाणकारांमधुन येत आहेत.

आचार्य टाकळी येथे ऊस उत्पादक शेतकरी मेळावा

ऊस उत्पादक शेतकरी मेळाव्यास मार्गदर्शन करताना-सुरेश माने

शिरसाळा ।प्रतिनिधी

ऊस पिकासाठी उगवण फुटवा कांडी निघणे जोमदार ऊस उगवणे जोमदार वाढ यासाठी सुरुवातीचे चार महिने महत्वाचे असून एकरी शंभर टन ऊस मशागतीसाठी मशागत होणे व बेणे निवड खत व्यवस्थापन नियोजन महत्वाचे असल्याचे मत ऊस तज्ञ उत्तम माने पाटील यांनी व्यक्त केले. परळी तालुक्यातील आचार्य टाकळी येथील शेतकऱ्यांसाठी खास करून या गावात ऊस उत्पादक मेळावा यावेळी ते बोलत होते. ट्रेंटीवन सुगर लिमिटेड युनिट. दोन सायखेडा या साखर कारखान्याच्या वतीने हा मेळावा आयोजन करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अध्यक्ष स्थानिक माजी पंचायत समिती सदस्य. मोहन आबा आचार्य .हे होते या गावचे सरपंच रामभाऊ तात्या घोडके .उपसरपंच . बबन जिजा आचार्य .ट्रेंटीवन शुगरचे शेतकी अधिकारी . तुकाराम गडदे .यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी . शेखर तावरे दिनेश जैस्वाल विठ्ठल लाटे भगवान सोळंके वैजनाथ हाडे व सोनपेठ विभागाचे शिरसाळा विभागाचे ट्रेंटी शुगरचे कर्मचारी महात्मे. साहेब राज किरवले .खंडू गाढवे .पवार साहेब .व गावातील ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते शेती उत्पादक गाव असल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सखोल अशी माहिती देण्यात आली .

सत्तेतील भाजप पक्षाचे गुलाम झालेल्या या पोलीस प्रशासनाच्या निषेधार्थ आंबेडकरी समाजाच्या १४ तारखेच्या मोर्चात लाखोच्या संख्येने उपस्थित -राहावे वडमारे

बीड ।प्रतिनिधी

जिल्ह्यातीलच नव्हे तर सबंध महाराष्ट्रातील आमदार खासदार लोकप्रतिनिधी याना माझी विनंती आहे की बीड जिल्हा येथे होत असलेल्या रेल्वे स्टेशनला महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी आपण लेखी स्वरूपाचे पत्र द्यावे अन्यथा येणाऱ्या निवडणुकीत आंबेडकर समाजाच्या मतदानापासून आपल्याला वंचित राहावे लागेल आंबेडकर समाज आपल्यावर बहिष्कार टाकेल मतदान करणार नाहीत

महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये भाजप सरकारने सर्वसामान्य लोकांना सत्तेच्या जीवावर चिरडण्याचाच काम केलं आहे सत्तेची मस्ती सामान्य लोकांवर दाखवत आहेत मग ते महाराष्ट्रातील आंदोलन असो किंवा देशातील आंदोलन असेल बीड येथे रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सामाजिक कार्यकर्त्यांनी दिले म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला लाठी चार्ज करण्यात आला महिलांना मारण्यात आले एवढेच नाही तर लोकशाही मार्गाने आंबेडकर समाजाच्या वतीने दलित समाजाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत शांततेत निघणाऱ्या रेल्वे सुद्धा पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली आहे एकीकडे बीड शहरामध्ये लाखो कोटीच्या संख्येने जनसमुदाय जेव्हा मोर्चा काढतो आंदोलन करतो उपोषण करतो त्यावेळेस प्रशासनाला वेगवेगळ्या लागतात आणि दलित आंबेडकरी समाजाला कोणताही सामाजिक किंवा सार्वजनिक कार्यक्रम करायचा असेल किंवा आंदोलन उपोषण करायचा असेल तर प्रशासनाच्या वतीने परवानगी नाकारली जाते गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जाते गुन्हे दाखल केले जातात अटक केले जात आहे लाठीचार्ज केला जात आहे या पद्धतीच पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन हे काम करत आहे यावरून भाजप सरकारचा हे संगी प्रशासन काम करत आहे ज्या पद्धतीने इतिहासामध्ये सर्वसामान्य लोकांना जगण्याचा अधिकार नव्हता समानतेचा अधिकार नव्हता त्याच पद्धतीची वागणूक आता पुन्हा आरएसएस प्रणित हे भाजप प्रशासन करत आहे बीड येथे रेल्वे स्टेशनला महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले म्हणून गुन्हा दाखल केला आहे याच्या निषेधार्थ व बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारकापासून ते कलेक्टर ऑफिस पर्यंत लोकशाही मार्गाने काढण्यात येणाऱ्या मोर्चाला प्रशासनाने परवानगी नाकारली याचा निषेध म्हणून आंबेडकरी समाजाच्या वतीने उद्या आंबेडकर पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालय परंतु मोर्चाचे आयोजन केले आहे हा मोर्चा शांततेच्या मार्गाने आहे सरकारच्या निषेधार्थ आहे बीड जिल्ह्याच्या एसपींना माझी विनंती आहे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना माझी विनंती आहे की आंबेडकरी समाजाच्या माय बहिणीवर वर व आंबेडकर समाजाच्या कार्यकर्त्यांवर लाठी चार्ज केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे पेड बीड पोलीस स्टेशनचे बंटेवाड यांना सेवेतून कायम डिसमिस केलं पाहिजे जातीय मानसिकतेतून त्यांनी रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नावाचा बोर्ड त्यांनी काढला आहे आणि विशेष म्हणजे हा बोर्ड त्यांनी रात्रीच्या आमदारांमध्ये काढला आहे त्यांना बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची ऍलर्जी आहे का राजघटनेने सामान्य लोकांना जे अधिकार दिले आहेत ते अधिकार

पोलीस प्रशासन सत्तेच्या जीवावर हिसकावून घेत आहे का लोकशाही मार्गाने लोकांच्या असलेल्या संस्थेला कोणाचे नाव द्यायचे आणि कोणाचे नाव नाही द्यायचे हे सामान्य जनतेला अधिकार आहेत लोक मागणी करू शकतात जनतेला अधिकार आहे या अगोदर सुद्धा या महाराष्ट्र मध्ये मराठवाडा युनिव्हर्सिटी ला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यायचं होतं यासाठी एक लढा उभा झाला आणि या लढ्यामध्ये अनेक भीम अनुयायांनी संघर्ष केला तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा बहुजनांचे नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार साहेबांनी सत्ता गेली तरी बेहतर मात्र मराठवाडा युनिव्हर्सिटी ला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेण्याचा निर्णय घेतला आणि त्या ठिकाणी औरंगाबाद येथे मराठवाडा युनिव्हर्सिटीचे नामांतर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा यूनिवर्सिटी म्हणून झालं आज माझी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती आहे तुम्हाला जर जाती आणि धर्माचा अहंकार नाही तर तुम्ही बीड जिल्ह्यातील बीड रेल्वे स्टेशनला महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नाव देऊन टाका अन्यथा तुम्हाला सत्तेवर राहण्याचा कोणताही अधिकार नाही सत्ताही सर्वसामान्यचे उपयोगाची असली पाहिजे २७ सर्व समाजाला घेऊन चालणारी असली पाहिजे या अगोदर या महाराष्ट्रात आणि या मराठवाड्यामध्ये अनेक महापुरुषांचे अनेक समाजसेवकांचे वेगवेगळ्या संस्थेला नाव देत असताना कधीही आंबेडकर समाजाने विरोध केला नाही तर प्रत्येकाच्या लढ्यामध्ये आंबेडकरी समाज हा सातत्याने उभा राहिला आहे त्यामुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील माझ्या आंबेडकर समाजासह भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम भीम आणि माझी विनंती आहे की बीड जिल्हा रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे नाव दिलं पाहिजे यासाठी आपण रस्त्यावर उतरून आंबेडकरी समाजाला सहकार्य करावे अन्यथा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे कार्यकर्ते बाबासाहेबांवर प्रेम करणारे कार्यकर्ते यांच्या मतापासून आपल्याला मुकावं लागेल बीड जिल्ह्यातील जो काही लोकप्रतिनिधी असेल आमदार असेल खासदार असेल मंत्री असतील किंवा अन्य कोणी असतील हे आमदार मंत्र्यांना सुद्धा माझी विनंती आहे की आपण लेखी स्वरूपाचे पत्र देऊन बीड जिल्हा रेल्वे स्टेशनला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी करा अन्यथा येणाऱ्या निवडणुकीमध्ये आंबेडकरी समाज हा तुमच्या सोबत नसेल बीड जिल्हा पोलीस एसपींना माझी विनंती आहे की आपण तात्काळ पेड बीड पोलीस निरीक्षक बंटीवार यांच्यावर निलंबनाची कारवाई करून समस्त आंबेडकरी समाजाची माफी मागावी

महाप्रचंड..! भगवान भक्तीगडावरील ऐतिहासिक दसरा मेळावा अतिविराट जनसागराने ओसंडला

आ. पंकजाताई मुंडेंच्या तडाखेबंद भाषणातून मिळाली सर्व सामान्यांना उर्जा
ऊसतोड मजूरांचे आयुष्य बदलल्याशिवाय शांत बसणार नाही
कोयते घासून ठेवा, महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात लवकरच येणार
मेळाव्यात दिसली सर्व जाती धर्माची व्रजमूठ

पाटोदा ।प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांचा भगवान भक्तीगडावरील आजचा दसरा मेळावा दरवर्षीच्या परपरेनुसार ऐतिहासिक असाच ठरला. यंदा मेळाव्यास अतिविराट जनसागर उसळला होता, मागील सर्व रेकॉर्ड गर्दीने मोडून काढले. कोयते घासून ठेवा, लवकरच महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात येणार आहे,

ऊसतोड मजूरांचे आयुष्य बदलल्याशिवाय शांत बसणार नाही असं ठणकावून सांगत वंचितांना, पिडितांना, दलितांना, गरिबांना त्रास दिला तर त्याचा हिशेब केल्याशिवाय

राहणार नाही. असा इशारा आ. पंकजाताईंनी यावेळी दिला.

राष्ट्रसंत भगवानबाबा यांचे जन्मगाव असलेल्या सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर आज पारंपारिक व ऐतिहासिक दसरा मेळावा मोठया उत्साहात पार पडला. हा मेळावा अतिविशाल गर्दीने व लाखोंच्या संख्येने आलेल्या सम

तेजस्विनी ग्रुप आयोजित दिवाळी धमाका

महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री एक्झिबिशनला उपस्थित राहा – सोनल पाटील

बीड ।प्रतिनिधी

आयोजित खास दिवाळी च्या निमित्ताने महिला उद्योजकांचे प्रदर्शन व विक्री ज्यामध्ये तुम्हाला उत्तम प्रतीचा घरी बनवलेला दिवाळी फराळ, कपडे ,हेअर ऑईल, देवांची वस्त्रे ,सोप्स,साड्या ,मनमोहक पैठणी, कुर्तीज दोहोड ,लेडीज वेअर्स,स्टोल, ओढणी, बांगड्या, मोत्याचे साहित्य ,फ्रॉक्स ,चॉकलेट्स ,सर्व प्रकारच्या पर्सेस ,स्वेटर्स, शुद्ध तुप ,आगरबत्ती ,पंचगव्य ,नैसर्गिक हळद ,तिखटी,लोणचे, सर्व प्रकारच्या चटण्या ,खाद्य पदार्थ, ज्वेलरी, टुर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स, सौंदर्य प्रसाधने , सर्व प्रकारचा , प्रोडक्ट ,बॅटरी संवर्धन सोलार उर्जा प्रोडक्ट ई. व खुप काही...! असे आयोजन कॅनॉल रोड, रामकृष्ण लॉन्स येथे मंगळवार दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत केले आहे तरी एक्झिबिशनला सहकुटुंब भेट द्या व खरेदी करुन छोट्या व्यवसायिकांना प्रोत्साहन द्या असे आव्हान तेजस्विनी ग्रुप अध्यक्ष सोनल पाटील यांनी केले आहे.

वाढदिवसाचे औचित्य साधून अपघातात मरण पावलेल्या शेख हमीद यांच्या मुलींना ५१००० रुपये आर्थिक मदत देऊन वाढदिवस साजरा केला

धारूर ।प्रतिनिधी

शहरातील मधील सामाजिक कार्यकर्ते सादेक भैय्या इनामदार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सादेक भैय्या इनामदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अपघातात मरण पावलेल्या शेख हमीद यांच्या मुलींना ५१००० रुपये आर्थिक मदत देण्यात आले.अनाथ मुलींना आर्थिक मदत केल्यामुळे त्यांचे कौतुक करण्यात आले. त्यानंतर धारूर शहरातील मिठु वट्टा येथे वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी विविध मान्यवरांनी त्यांना भेटून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. धारूर शहरातील अनेक युवकांनी त्यांना भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर , उद्योग, बँकिंग व न्याय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान मधील रस्ते कामास सुरुवात

नगरसेवक मुखित लाला यांच्या पाठपुराव्याला यश

बीड ।प्रतिनिधी

शहरामध्ये विविध विकास कामाचा शुभारंभ माजी मंत्री जयदत्त(अण्णा) क्षीरसागर यांच्या माध्यमातून होतं आहेत. अनेक वर्षापासून शहरातील भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान येथील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती झाली नसल्याने या भागातील नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत होता, श्री संत भगवान बाबा यांचे मंदिर असल्याने अनेक भाविक भक्त दर्शनासाठी तसेच भजन कीर्तन ऐकण्यासाठी येत असतात त्यांना देखील या खराब रस्त्याच्या सामना करावा लागत होता. पावसाळ्यात तर या रस्त्यावर चालणे देखील मुश्किल होते,तसेच

अनेक महिलांच्या दुचाकी घसरून जखमी झाल्या होत्या.त्यामुळे स्थानिक नागरिकांनी नगरसेवक मुखीद लाला यांच्याकडे अंतर्गत रस्ते करून द्यावी अशी मागणी केली.मुखिद लाला यांनी प्रत्यक्ष मागणी जयदत्त(अण्णा)क्षीरसागर यांच्याकडे पाठपुरावा केल्याने बीड प्रभाग क्र.१६ मधील सिमेंट रस्ते कामाचे उदघाट्न समारंभ,मा.माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या माध्यमातून करण्यात आले.या भागातील ज्येष्ठ नागरिक सुलाखे सर,पिंगळे साहेब, मुंडे सर,कोरडे सर,यांच्या हस्ते रस्ते कामाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी लगाने सर,अशोक जोगदंड,संदीप केदार, विलास कोरडे, सुधीर हजारे,वायबसे साहेब,प्रदीप केदार,सुदर्शन भिसे,अक्षय देशपांडे,आनंद वीर यासह नागरिक उपस्थित होते. रस्ते कामास प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक मुखीद लाला यांचे आभार व्यक्त करत स्वागत केले.

इच्छुकांची गंमत; मतदारांनी सावध राहण्याची गरज!

सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहेत. या अनुषंगाने राजकीय आखाड्यात चांगलेच रमलेल्यांनी आणि नवोत्सुक असलेल्यांनी आपापल्या पद्धतीने आपापल्या शैलीनुसार साम, दाम, दंड, भेद सह जनतेसमोर जाण्याचा किंवा जनतेला आपल्याकडे बोलविण्याचा प्रयत्न चालविला आहे. अशाच प्रकारे काल एका संघटनेच्या सर्वेसर्वा असलेल्या व्यक्तीने पत्रकार परिषद बोलावली. मी जरी पत्रकार म्हणून वृत्तपत्र क्षेत्रात वावरत असलो तरी राजकीय लोकांच्या पत्रकार परिषदांमध्ये कधीच हजेरी लावत नाही. कारण अशा पत्रकार परिषदांमध्ये सत्य आणि वस्तुस्थिती बाजूला सारून ९०% भामटेगिरी, खोटे-नाटे, गोडी-गुलाबीने पत्रकारांच्या समोर मांडले जाते. वस्तुस्थिती मात्र त्यापेक्षा वेगळी असते. असो!

हो तर काल घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये संबंधित व्यक्ती राजकारणी नसल्याने तसेच कुठल्याही पक्षाशी, नेत्याशी साधे कार्यकर्ते म्हणून सुद्धा संलग्न नसल्याने एक मोठ्या सामाजिक संघटनेचे सर्वेसर्वा म्हणून त्यांच्या निमंत्रणावर पत्रकार परिषदेत जातीने उपस्थित राहिलो. तेव्हा राजकारणाचा कुठलाही गंध किंवा अनुभव नसलेल्या या साध्या व्यक्तीने सुरुवातीलाच पत्रकारांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. त्याच मनोगतातून प्रश्न हेरून जेव्हा पत्रकार मंडळी प्रश्नांचा भडीमार करू लागले, तेव्हा अपेक्षेप्रमाणे तो व्यक्ती गडबडला. एवढेच नाही तर त्याने मी पहिल्यांदाच पत्रकार परिषदेला सामोरे जात आहे हे लक्षात घेऊन जरा सोपे प्रश्न विचारा ना राव. अशा अवघड प्रश्नांचा भडीमार तोफगोळ्यासारखा माझ्यावर करू नका. मी गोंधळतोय, असे साधे सरळपणाने सांगून टाकले. त्या व्यक्तीची ही अवस्था पाहता राजकीय क्षेत्र हा त्या माणसाचा पिंड नाही. यावर पत्रकार परिषदेत जमलेल्या पत्रकारांमध्ये कुजबूज सुरू झाली. कुणी आपण विचारलेल्या प्रश्नानंतर कशी घाबरगुंडी उडाली, यावर बोलत होते तर कुणी राजकारण हा त्याचा प्रांत नाही असे म्हणत होते. असो!

एकदाची ही पत्रकार परिषद अवघ्या अर्धा तासाच्या आतच संपली आणि त्यानंतर संबंधित इच्छुक व्यक्तीकडून ठेवण्यात आलेल्या जेवणाचा आस्वाद उपस्थित सर्व पत्रकारांनी घेतला आणि आपापल्या मार्गाला लागले. आज सकाळी व संध्याकाळी येणारी वृत्तपत्रे चाळून पाहिल्यानंतर एकाध दुसरा अपवाद वगळता त्या पत्रकार परिषदेची बातमी वृत्तपत्रात दिसलीच नाही. याचाच अर्थ त्या व्यक्तीला पत्रकार परिषदेत उपस्थित असलेल्या जवळपास ५० पत्रकारांनी उमेदवार म्हणून नाकारले, असा घ्यावा का? असा प्रश्न उपस्थित होतो आहे. कारण तत्पूर्वी या पत्रकार परिषदेत मोजक्याच पत्रकारांनी मोजकेच आणि तीही नेहमीचीच प्रश्न विचारली असता त्यावर त्या व्यक्तीकडून आलेली उत्तरे अत्यंत गमतीशीर होती. किंबहुना त्या उत्तरातून राजकीय अपरिपक्वता दिसत होती. पत्रकाराने विचारले, तुम्हाला सामाजिक कार्य करता-करता असे का वाटू लागले की तुम्ही विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरावे आणि निवडणूक लढवावी? तर यावर त्या व्यक्तीचे उत्तर होते, राजकारणात येणे किंवा निवडणूक लढविणे माझ्या ध्यानीमनी नव्हते परंतु तुम्हीच पत्रकारांनी आपापल्या वृत्तपत्रातून मी कसा चांगला उमेदवार राहील, माझे ४० विधानसभा मतदारसंघावर कसे प्रभुत्व आहे? मी आणि आमच्या संघटनेने ठरविले तर या ४० ही विधानसभा मतदारसंघात उमेदवार निवडून ही आणू शकतो किंवा पाडूही शकतो. असे सर्व काही आकडेवारी सहित मांडले, ते सर्व वाचून आणि वारंवार पाहून विचार केला की, सर्वांचीच तशी इच्छा असेल तर उतरावेच राजकारणात आणि आमदारकी लढवावीच म्हणून ही पत्रकार परिषद ठेवून तुम्हा सर्वांना बोलावले. आता या उत्तरात आहे की नाही गंमत म्हणजे कसं बघा. तुमची इच्छा असो किंवा नसो परंतु वृत्तपत्रात पत्रकार लिहितात म्हणून आपण उमेदवार व्हावे असे जर वाटत असेल तर किती हा बालिशपणा. आज कालच्या युगात निवडणुकीत उतरणे, निवडणूक लढविणे आणि जिंकून येणे हे काही येऱ्या-गबाळ्याचे काम नाहीच. त्यासाठी नाकाने केळी सोलून दाखवावी लागते. लोखंडाचे हरभरे चावावे लागतात. शिवाय सगळ्यात मोठी बाब म्हणजे जनतेला मूर्खात काढण्याचा बेरकी आणि हरामीपणा अंगी असावा लागतो. परंतु हा बिचारा नामवंत

संघटनेचा सर्वेसर्वा, साधा सरळ, चांगल्या मनाचा माणूस या सर्व बाबी कशाशी खातात याचा गंधही नसलेला, सोज्वळ माणूस. हा माणूस जर खरेच कोणत्याही एखाद्या पक्षाकडून उमेदवार होऊन मैदानात उतरला किंवा कोणत्याही पक्षाने तिकीट दिले नाही तर अशावेळी कोणत्या सेक्युलर पक्षाच्या उमेदवाराला पाठिंबा द्यावा हे सुद्धा मनाने ठरवू शकत नसलेला, असे याच व्यक्तीने पत्रकार परिषदेत सांगितले. तर मग अशा व्यक्तीला आपला नेता आपला आमदार म्हणून जनता कशी मान्य करेल? कसे मतदान करेल? असे प्रश्न नक्कीच उपस्थित होतात. कारण ज्याला स्वतःला राजकारणात गेल्यानंतर नेमके काय करायचे? कसे करायचे? याचा कुठलाही अभ्यास नाही, तर मग तो लबाडांच्या राजकीय दुनियेत कसा जाऊ शकतो? हा प्रश्न सुद्धा उपस्थित होतो आहे. असो! कारण ज्या व्यक्तीला कोणत्याही पक्षाची काम करण्याची पद्धत माहित नाही. कधी कोणत्या पक्षाची नाळ जुळलेली नाही. राजकीय क्षेत्रात कुठलेही कार्य नाही. स्वतः निवडणुकीत उभे राहून निवडणूक लढविण्याचा अनुभव नाही. आमदार तर दूर कधी नगरसेवकाची निवडणूक सुद्धा लढवली नाही. अशा सर्व नाही असलेल्या बाबी असून सुद्धा फक्त आपल्या हाती एक मोठी संघटना आहे, तीही राजकीय नाही तर सामाजिक आहे. तरीसुद्धा आमदारकीच्या निवडणुकीत उभे राहण्याचे धाडस एक संघटनेचा सर्वेसर्वा कसा करू शकतो? ज्याला राजकारणाचा काहीच गंध नाही. यामुळे काही पत्रकार मंडळी आपसात कुजबूज सुद्धा करत होती की, हेच राजकारणात उतरू इच्छितात की, यांना पडद्यामागून कुणीतरी मदत करत डमी म्हणून पुढे आणून अशा नवख्यांना निवडणुकांच्या मैदानात उतरवून ठराविक जातीच्या किंवा धर्माच्या मतांची विभागणी करून आपले इप्सित किंवा आपली महत्वाकांक्षा साध्य करू पाहत आहे का? की ही व्यक्तीच स्वतः होऊन पुढे येऊन कोणत्यातरी एखाद्या पक्षासोबत आर्थिक देवाणघेवाण करण्याकरिता हे पाऊल उचलत आहे? असेही प्रश्न उपस्थित केले जात होते. असो!

राजकारणी असो की, संघटनात्मक कार्य करणारे असो. ते आपल्या परीने विचार करतात. आपल्याला नेमका कशात फायदा होईल? कोणता मार्ग अवलंबवावा? यासाठी नेहमीच दक्ष व सतर्क राहतात. मात्र मतदार राजा नेहमीच बेसावध असतो. कधी भावनेच्या भरात, कधी जाती धर्माच्या आवेशात तर कधी बोटी आणि चपटीच्या आमिषात तर कधी करकरत्या नोटांच्या आमिषाने मतदानादिवशी मतदान करून मोकळा होतो व नंतर पाच वर्ष तोच मतदार त्याच्याच मतदान करण्याच्या चुकीमुळे निवडून आलेल्या निष्क्रिय लोकप्रतिनिधीच्या नावाने बोंबा मारत फिरत असतो. मजबूत आणि सुदृढ लोकशाही करिता ही शोचनीय बाब आहे. असे होऊ नये नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार, खासदार या लोकशाहीच्या पदांसाठी योग्य आणि लायक उमेदवारालाच मतदान करून निवडून आणावे. खोगीरभरती वाढविणाऱ्या इच्छुकांनी अशा कितीही गमती केल्या तरी मतदार राजा हो, मतदान करताना तुम्हाला दक्ष व सावध राहण्याची गरज आहे.

लेखन – एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)
आसेफ़नगर, बीड.
संपर्क – ९०२१ ०२ ३१२१

गेवराईत संजय गांधी व श्रावणबाळ योजनेत पुन्हा बोगस लाभार्थी; खरे लाभार्थ्यांना डावलले..!

- गेवराई तहसीलमध्ये १२ हजार संजयगांधी व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर मंजूर यादीत तरूण लाभार्थ्यांची संख्या असून, खरे लाभार्थी आणि निराधार अद्याप वंचित?
- तहसील प्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्राप्त अर्जांची छाननी करूनच मंजूर दिली आहे का?
- समितीचा आणि तहसील कार्यालयाचा सावळा गोंधळ आणि बोगस कारभार चव्हाट्यावर? मंजूर यादी तात्पुरत्या स्वरुपात प्रलंबित करून चौकशी करा मग सत्य बाहेर येईल?
- मंजूर झालेल्या सर्व लाभार्थ्यांची चौकशी करूनच लाभ द्यावा; सामान्य नागरिकांची मागणी
- मंजूर यादीतील सर्व लाभार्थ्यांची चौकशी करून त्यांना आदेश वितरित करण्याची सर्व सामान्यांची मागणी जिल्हा प्रशासनाने हे प्रकरण गंभीर घेऊन दोषींवर कारवाई करणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार?

गेवराई । प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाने गोर गरिबांना, दिव्यांगाना व वृद्धांना मदतीचा हात मिळावा म्हणून संजय गांधी निराधार योजनेंतर्गत 'श्रावण बाळ योजना' सुरू केली. परंतु या योजनेत ६५ वर्षे वय पूर्ण करणाऱ्या वृद्धांचा समावेश करण्याचे शासन निर्णय असून देखील मात्र गेवराई तालुक्यातील वयोमर्यादा पूर्ण न करणाऱ्यांची नावे दलालामार्फत मंजूर यादीत समावेश करण्यात आल्याने खरे लाभार्थ्यांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

असे खरे लाभार्थ्यांना डावलून पात्र नसलेल्यांना पात्र ठरवल्यांने खरे लाभार्थ्यांवर अन्याय होत असल्याची चर्चा आहे. वयोवृद्ध, विधवा, परितक्तत्या, निराधार यांना आधार मिळावा यासाठी शासनाकडून महिन्याला मानधन रूपात पगार करण्यात येते. परंतु ह्या योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. कारण अधिकारी आणि लाभार्थी यांच्यामध्ये दलालांनी घुसखोरी केली असून, आर्थिक तडजोड करून ज्यांचे वय बसत नाही ज्यांना लाभ देता येत नाही. अशा लोकांना लाभार्थी बनवून शासनाची फसवणूक करण्यात येत असून याला निवड समिती आणि तहसील प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी जबाबदार आहेत. अशी चर्चा सदरील मंजूर यादी बघितल्यानंतर सामान्य जनतेतून आणि अपात्र लाभार्थ्यांतून होत आहे. गेवराई तहसील मध्ये तालुक्यातील निवड संजय गांधी, श्रावणबाळ योजनेअंतर्गत करून यादी प्रसिद्धी करण्यात आली असून, यामध्ये ज्यांना लाभ मिळाला पाहिजे असे लाभार्थी वंचित ठेवून, गावागावात आपल्या वतीचे बोगस लाभार्थी दाखवून शासनाची फसवणूक केली असल्याने यामध्ये अधिकारी सहभागी आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात असून, मंजूर झालेल्या सर्व लाभार्थ्यांची पाहणी आणि चौकशी करूनच लाभ द्यावा अशी मागणी होत आहे.

तसेच जिल्हा प्रशासनाने हे प्रकरण गंभीर घेऊन दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्यांकडून होत आहे. गेवराई तहसील मध्ये तालुक्यातील लाभार्थ्यांची निवड संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांची मंजुरी झाली असून यामध्ये खरे लाभार्थी वंचित राहिले आहेत. तर ज्यांना लाभ देता येत नाही ज्यांचं वय पूर्ण नाही, ज्यांची नावे या योजनेत बसूच शकत नाही. अशा लोकांचे नावे हे यादीत आले आल्याने हा सावळा गोंधळ आणि मनमानी कारभार चव्हाट्यावर येत आहे. शासनाकडून वयोवृद्ध, विधवा, दिव्यांग, ज्यांना एक मुलगा आहे असे आई-वडील यांना श्रावणबाळ योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो, परंतु अनेकांना कागदपत्रे जमा करताना त्रास होतो यामुळे त्यांच्याकडून तहसील या ठिकाणी कागदपत्रे जात नाहीत असे लोक या योजनेपासून वंचित राहतात. आणि याचाच फायदा एजंट लोक घेत असून दोन ते तीन हजार रुपये घेऊन पगार लावण्याचे काम तालुक्यातील अनेक बहाद्दर करत आहेत. यामध्ये अधिकारी यांना हाताशी धरून अनेक जण बोगस लाभार्थी यांना लाभ मिळवून देत असल्याने खरे लाभार्थी वंचित राहिलेले आहेत. यावर जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्यामार्फत समिती नेमणूक करण्यात येते, परंतु ही समिती मर्जीतल्या लोकांना प्रधान्य देत असल्याने यामध्ये राजकारण येते. सध्या गेवराई तहसील मध्ये जवळपास १२ हजार संजयगांधी व श्रावणबाळ लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर झाले आहेत. परंतु यांच्या फाईल अधिकारी कर्मचारी यांनी तपासले आहेत का? समितीने जे नावे मंजूर केली ते नावे शासनाच्या नियम आणि अतीच्या अधीन राहून मंजूर केलेत का? शासनाचे निकश डोळ्यासमोर ठेवून तहसील कार्यालयात प्राप्त अर्जांची छाननी केली आहे का? या सर्व बाबी तपासणी गरजेचे असताना देखील असे काहीच न करता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून यादी मंजूर करण्याचा धडाका संजय गांधी आणि श्रावणबाळ समितीने लावला आहे. यामध्ये तहसील प्रशासनातील अधिकारी यांनी आलेले अर्ज आणि फाईल तपासणी केली की नाही असा प्रश्न उपस्थित होत असून, मंजूर यादी मधील सर्वांची चौकशी करूनच त्यांना आदेश वितरित करावे

आहेर वडगाव येथे कृषिकन्यानी शेतकऱ्यांना दिले दशपर्णी अर्क तयार करण्याचे मार्गदर्शन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषिकन्या लिपाक्षी आघाव,आरती फड, वर्षदा कव्हर, वैष्णवी शितोळे,प्राची भोंडे,प्राची कांबळे ग्रामीण कृषि कार्यानुभव व कृषी औद्योगिक उपक्रम २०२४-२५ अंतर्गत कृषिकन्यानी दशपर्णी अर्क कसा तयार करायचा या संदर्भात गावातील शेतकरी वर्गाला सविस्तर माहिती दिली.महागड्या कीटकनाशकांचे अनेक दुष्परिणाम समोर येत आहे.जमिनीचा पोत बिघडण्यापासून तर मानवी जीवास हाणीकारक ठरणाऱ्या कीटकनाशकांचा वापर टाळून त्याला पर्याय म्हणून दशपर्णी अर्काचा वापर करण्याचा सल्ला कृषिकन्यानी दिला.दशपर्णी अर्क हे उत्तम प्रतीचे किडनाशक, बुरशीनाशक व टॉनिक इत्यादी सर्वच प्रकारचे कार्य करते. या संदर्भात सविस्तर माहिती दिली. यासाठी कृषि शास्त्र विभागाचे विषयतज्ञ ओ. एन. राऊत सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या अभ्यासदौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी. बी. तांबे सर, प्राचार्य श्री ए. यु. सानप सर, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. जी. मोरे सर, कार्यक्रम अधिकारी व्ही. बी. शिंदे सर आणि महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वर्गाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

पत्रकार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रविंद्र चिंचोलकर तर उद्घाटक एस. एम. देशमुख

स्वागताध्यक्षपदी क्रिडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

उदगीर : येथील रंगकर्णी साहित्य ,कला ,क्रिडी प्रतिष्ठानच्या वतीने २० ऑक्टोबर २०२४ रोजी होऊ घातलेल्या पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षपदी आहिल्यादेवी होळकर होळकर विद्यापीठाचे वृतपत्र माजी विभाग प्रमुख जेष्ट पत्रकार डॉ. रविंद्र चिंचोलकर यांची तर उद्घाटक म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. या समेलनायच्या स्वागताध्यक्षपदी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री यांची निवड करण्यात आल्याची माहिती मुख्य संयोजक बिभीषन मद्देवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आली.

पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संम्मेलनाचे आयोजन २० आक्टोबर रोजी शहरातील रघुकुल मंगल कार्यालयात एक दिवसाचे संम्मेलन पार पडणार आहे. रविवारी (ता.२०) रोजी सकाळी ८.३० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या पासुन संविधान दिंडीने संमेलनाची सुरुवात होणार असून, १०. ३० वाजता मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. संमेलनाचे अध्यक्ष म्हणून अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे वृत्तपत्र विभागाचे प्रमुख तथा जेष्ट पत्रकार डॉ. रवींद्र चिंचोलकर,तर स्वागताध्यक्ष तथा प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे लोकप्रिय कँबिनेट मंत्री ना. संजय बनसोडे उपस्थित राहणार आहेत. या समेलनानात परिसंवाद,न्युसलेस कवितेची काव्यमैफील , कविसम्मेलन, विविध चँनलचे वृतनिवेदक चर्चा सत्रा मध्ये सहभागी होणार असून यावेळी पत्रकारीता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना राज्यस्तरीय पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.या सह अनेक कार्यक्रम आयोजित केले जाणार असल्याचेही राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनाचे मुख्य आयोजक प्रा.बिभिषण मद्देवाड, सुनिल हावा पाटील, अर्जुन जाधव, श्रीनिवास सोनी, सिद्धार्थ सुर्यवंशी, नागनाथ गुट्टे,सचिन शिवशेट्टे यांच्या कडून सांगण्यात आले.

च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीजजोडणीसाठी जलसमाधी आंदोलन

प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव :- डॉ.गणेश ढवळे

बीड: बीड तालुक्यातील च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ८ वर्षांपूर्वी ५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असुन सुरूवातीपासूनच वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असुन वारंवार आंदोलनानंतर वीज जोडणीसाठी मंजुर झालेला १६ लाख रुपयांचा निधी जिल्हा परिषद बांधकाम विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आणि जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्या हलगर्जीपणामुळे २ वेळा अखर्चित राहीलेला असुन काम न केल्याने निधी पडुन आहे.त्यामुळे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी आणि प्राथमिक आरोग्य केंद्राला तातडीने वीज जोडणी करावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस यांच्या नेतृत्वाखाली ऊद्या दि.१४ सोमवार रोजी सकाळी ११ वाजता च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील काकदरा साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी ,जिल्हा आरोग्य अधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात आले आहे.

बीड तालुक्यातील च-हाटा येथे ८ वर्षांपूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ५ कोटी रुपये खर्चून प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्यात आली. पंचक्रोशीतील ग्रामस्थांना चांगल्या सुविधा मिळाव्यात.बीडला जाण्याचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागु नये हा उद्देश होता.मात्र ईमारतीचे बांधकाम झाल्यानंतर ईमारत आणि अधिकारी कर्मचारी निवासस्थाने यांना वीजजोडणी करण्यात आलीच नाही.त्यामुळे अधिकारी आणि कर्मचारी मुख्यालयी रहात नसल्याने रूग्णांना उपचारासाठी बीडला जावे लागते.वीजजोडणी अभावी प्रसूती, शस्त्रक्रिया,आंतररुग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नाहीत.

च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार यांनी च-हाटा येथे रास्ता रोको आंदोलन, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २ वेळा धरणे आंदोलने केल्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी विद्युत रोहित्र बसविणे व ईतर संलग्न कामासाठी १६ लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आलेला होता.परंतु अद्याप बांधकाम विभागाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने अद्याप वीज जोडणी करण्यात आलेली नाही. च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वीज जोडणी अभावी आरोग्य केंद्रातील असुविंधांचे एकंदरीतच जिल्हा आरोग्य विभाग आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना यांचे गांभीर्य दिसून येत नाही.

विभागीय कुस्ती स्पर्धेत साक्षाळपिंप्री विद्यालयाचा निखील तनपुरे प्रथम

नवगण राजुरी ।प्रतिनिधी

क्रिडा व युवकसेवा संचालनालय पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या विभागीय पातळीवरील ग्रिको रोमन कुस्ती स्पर्धेत साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या निखील तनपुरे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला असून त्याची राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शुक्रवार दि.११ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या विभागीय शालेय कुस्ती स्पर्धेत १९ वर्षाच्या खालील मुलांमध्ये ६३ किलो वजन गटात साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निखील नवनाथ तनपुरे या खेळाडूने विभागिय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला असून दि.१४ व १५ ऑक्टोबर रोजी पाथर्डी जि.अहमदनगर येथे होणार्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी तो पात्र ठरला आहे. या खेळाडूस शाळेचे पर्यवेक्षक जे.एम.काळे यांचे मार्गदर्शन लाभले. निखील तनपुरे या विद्यार्थ्याने मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT